पत्रकार राजेंद्रकुमार शेळके

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त फार्मसी हडपसर येथे ‘बेसिक लाईफ सेव्हिंग कार्यशाळा’

पुणे न्यूज नेटवर्क राजेंद्रकुमार शेळके पुणे,mj पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचo (PDE-) माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांच्या मालिकेतील एक उपक्रम म्हणून पीडीईए कॉलेज ऑफ फार्मसी, हडपसर येथे बेसिक लाईफ सेव्हिंग कार्यशाळा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांनी उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना, अशा जीवनरक्षक प्रशिक्षणाचे समाजहिताच्या दृष्टीने असलेले महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अशा प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केले. त्यानंतर डॉ. अविनाश पांडे यांनीही मार्गदर्शनपर भाषणातून आपत्कालीन परिस्थितीत योग्य वेळी योग्य प्रथमोपचाराचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे आकर्षण म्हणजे डॉ. अविनाश पांडे यांनी दिलेले प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण. त्यांनी सहभागींचे लहान-लहान



गट तयार करून विविध आपत्कालीन परिस्थितींची उदाहरणे दिली आणि अशा प्रसंगी नेमकी कोणती कृती करावी, याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी स्वतः प्रात्यक्षिके करून जीवनरक्षक कौशल्यांचा अनुभव घेतला.

प्रशिक्षणादरम्यान डॉ. पांडे यांनी सीपीआर (Cardiopulmonary Resuscitation) ची संपूर्ण प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितली. हृदयक्रिया व श्वसन बंद पडलेल्या व्यक्तीला योग्य पद्धतीने छातीवर दाब देणे, कृत्रिम श्वसन देण्याची पद्धत आणि वेळेचे महत्त्व याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच एईडी चा वापर कसा करावा, त्याची कार्यपद्धती आणि आपत्कालीन परिस्थितीत त्याचे महत्त्व याचेही प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले.

याशिवाय, घशात अन्न किंवा इतर वस्तू अडकल्यामुळे (उहेझळपस) निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला सुरक्षितपणे मदत कशी करावी, योग्य प्रथमोपचार कसा द्यावा आणि अशा प्रसंगी घाबरून न जाता योग्य निर्णय कसा घ्यावा, याबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामुळे उपस्थित सहभागींचा आत्मविश्वास वाढला असून, गरज पडल्यास त्वरित व प्रभावी मदत करण्यासाठी ते सक्षम झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या अथक परिश्रम, काटेकोर नियोजन, दूरदृष्टी, प्रभावी नेतृत्व आणि सातत्यपूर्ण प्रेरणेच्या बळावर कार्यक्रमाचे अत्यंत सुरळीत व यशस्वी आयोजन करण्यात आले. त्यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे व मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाची प्रत्येक बाब उत्कृष्टरीत्या पार पडली.

यावेळी पीडीईए लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. रंजना पाटील, महात्मा फुले इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टर, डॉ. अश्विनी वालेकर तसेच ए. एम. कॉलेजचे प्रा. डॉ. निकम उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी प्रशिक्षणातील प्रत्यक्ष सहभागातून जीवनरक्षक कौशल्ये आत्मसात केली आणि अशा प्रकारचे प्रशिक्षण समाजासाठी अत्यंत उपयुक्त असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी आदरणीय अजितदादा पवार यांच्या सेवा, प्रेरणा आणि सक्षमीकरण या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्ष मा. सुनेत्राताई पवार, उपाध्यक्ष मा. राजेंद्र घाडगे, मानद सचिव मा. ॲड. संदीप कदम, खजिनदार मा. ॲड. मोहनराव देशमुख तसेच श्री. एल. एम. पवार व श्री. ए. एम. जाधव यांनी शुभेच्छा देत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. देवयानी किरवे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी नियोजन व समन्वयाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हजगुडे व प्रा. शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर प्रा. वाघ यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.